N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** शिवाजी नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0051 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/02/2023 03:54

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 24/02/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/02/2023
**Time From (वेळेपासून):** 18:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/02/2023 **Time (वेळ):** 03:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/02/2023 03:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मोदीबाग 1 बिल्डींगच्या , आवारामध्ये, गणेशखिंड रोड,शिवाजीनगर, पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): दिलीप नम्बुरी कंडतील

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1970

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जी 501, एअर कस्टल को-,ऑपरेटीव्ह सोसायटी, ,मारुंजी एलर्ड कलेज जवळ पुणे,411057,हिंजवडी ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जी 501, एअर कस्टल को-,ऑपरेटीव्ह सोसायटी, ,मारुंजी एलर्ड कलेज जवळ पुणे,411057,हिंजवडी ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9527069124

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | तुळशीदास आश्रु आंधळे उप विभागीय अधिकारी भामा आस्केड सिंचन | | | 1. अँक्वा मिस्ट सोसायटी, फ्लट नं 302 ,शिंदे वस्ती जवळ, रावेत, पुणे ,वाकड पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनाच्या 500/ रु. दराच्या एकुण 300 नोटा व खेळण्यातील 500 रु दराच्या एकुण 400 नोटा. | 350,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

350,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

जबाब -दिनांक-25/02/2023
मी श्री.दिलीप नम्बुरी कंडतील, वय-53 वर्षे, व्यवसाय-जमिन खरेदी-विक्री व्यवहार, राह-जी-501, एअर कॅस्टल को-आपॅरेटीव्ह सोसायटी, मारुंजी एलर्ड कॉलेजजवळ, पुणे-411057, मोनं-9527069124. समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी दिनांक-23/02/2023 रोजी अँटीकरप्शन ब्युरो, पुणे येथे तक्रार दिली होती ती पुढीलप्रमाणे-

"मी वरील नमुद अर्जदार असुन माझा जमिन खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. मी वेगवेगळ्या इन्वेस्टरच्या मदतीने त्यांचे नावावर जमिनी/प्लॉट घेवुन त्या डेव्हलप करण्याचे काम करतो. सदरचे जमिनी डेव्हलप केल्यानंतर त्या जमिनी इन्वेस्टर व्यक्ती विकतात त्यामध्ये मला कमिशन मिळते तसेच जमिन/प्लॉट डेव्हलप केल्याच्या मोबदल्यामध्ये मला माझी डेव्हलपमेंट कॉस्ट मला मिळते.

दीड ते दोन वर्षापुर्वी मी गट नं-981, कोळीए, ता-खेड, जिल्हा-पुणे याठिकाणची दीड एकर जागा माझ्या स्वत:च्या नावावर तसेच माझे पार्टनर 1) श्री.राहुल अग्रवाल, 2) प्रवीण अग्रवाल असे आमचे तिघांचे नावावर आहे. सदरचे जागेवर मला घर बांधण्यासाठी मी सुमारे 8 महिन्यापासुन बांधकाम सुरु केलेले आहे. त्यासाठी मी सदरची जागा प्रथम सपाटीकरण करुन घेतली तसेच सदरची जागा ही उतारावरील असल्याने माती थांबविण्यासाठी दगडी भिंत बांधली आहे.

त्याचप्रमाणे मी बांधत असलेल्या घराचे जागेच्या शेजारील आजुबाजुची सर्व जागा माझे इन्वेस्टर्सनी विकत घेतलेली असुन ती डेवलप करुन विक्री करण्यासाठी माझेकडे देण्यात आलेली असुन सदरची साधारण 20 एकर जागा मी डेवलप करीत आहे. त्यासाठी मी सदरच्या जागेमध्ये सपाटीकरण केले आहे, तसेच धरणाजवळील उतार कमी करण्यासाठी जेसीबी लावुन उतार कमी केलेला आहे. त्यासाठी जमिन उकरुन तीचे सपाटीकरण केलेले आहे. सदरची जागा ही आमची खाजगी असुन त्यामधुन ओढा जात असल्याने सदरच्या ओढच्या वाटेमध्ये मो--या टाकुन पाण्याची वाट काढुन दिलेली आहे. सदरचे जमिनीचे डेवलपमेंटचे काम चालु असताना तीन महिन्यापुर्वी एका रविवारी श्री.आंधळे तुलसीदास, डेप्युटी इंजिनियर, भामा आस्केड धरण, करंजी विहीरे, ता-खेड, जिल्हा-पुणे हे माझे घर बांधणीचे ठिकाणी तसेच त्याचे शेजारील डेवलपमेंट चालु असलेल्या ठिकाणी आले व त्यांनी मला सांगितले की, तुम्ही सदरची जागा डेवलप करण्यासाठी सदरची जागा धरणाजवळ असुन ती तुम्ही उकरली आहे, तिचे सपाटीकरण केले आहे, पुर रेषेच्या आतमध्ये तुम्ही डेवलपमेंटचे काम केले आहे त्यामुळे तुमच्यावर रितसर कारवाई होवु शकते, तुमच्यावर कारवाई केली तर मग तुम्ही कोर्टामध्ये लढत बसा, आणि ते जर करायचे नसेल किंवा कारवाई टाळायची असेल तर तुम्हाला मला 20 गुंठे जमिन माझ्या नावावर करुन द्यावी लागेल असे सांगितले. तेव्हा मी त्यांना मी जमिन देवु शकत नाही असे सांगितले असता त्यांनी मला त्यानंतर दिनांक-17/02/2023 रोजी रावेत येथील कृष्णा हॉटेल, मुंबई-पुणे हायवे येथे सायंकाळी 07.15 वाजताचे सुमारास भेटण्यासाठी बोलाविले. त्यावेळी देखील त्यांनी माझ्याकडे 20 गुंठे जागा नावावर करुन देण्याची मागणी केली. परंतु मी करीत डेवलपमेंट हे कायदेशिर असुन मी शासकीय मोजणी करुन त्यानंतरच माझ्या खाजगी जागेमध्ये तसेच माझे इन्वस्टर्सचे जागेमध्ये इन्वेस्टर्सच्या

परवानगीने डेवलपमेंट करीत आहे व ते कायदेशिर आहे. परंतु मी कायदेशिर काम करित असुनही श्री.आंधळे तुलसीदास, डेप्युटी इंजिनियर हे मला माझे डेवलपमेंटच्या कामाचे संबंधाने तुमच्यावर कारवाई होईल व ती टाळायची असेल तर तुम्हाला 20 गुंठे जागा मला द्यावीच लागेल असे सांगत होते. परंतु मी त्यास नकार दिल्याने त्यांनी माझेकडे 15 लाख रुपये द्यावे लागतील असे मला सांगितले. माझेवर विनाकारण होणारी कारवाई टाळण्यासाठी व माझी बाजु बरोबर असुन देखील कोर्टामध्ये जाणारा माझा वेळ व पैसे वाचविण्यासाठी मी नाईलास्तव श्री.आंधळे तुलसीदास, डेप्युटी इंजिनियर यांना 7,00,000/- रुपये देण्यास तयारी दर्शविली. तेव्हा त्यांनी मला सांगितले की, " दिनांक-24/02/2023 रोजी मला 3, 50,000/- रुपये द्या व उर्वरीत 3,50,000 /- रुपये पुढच्या मार्च महिन्यामध्ये द्या व याबाबत मला पुन्हा भेटायला बोलवु नका हे जे ठरले आहे त्याप्रमाणे आता पैसे घेवुनच या, तसेच येताना एकटेच या, कुणालाही सोबत आणु नका"श्री.आंधळे तुलसीदास, डेप्युटी इंजिनियर हे मागत असलेली रक्कम ही लाच रक्कम असल्याने व मी करित असलेले काम हे कायदेशिर असल्याने माझी त्यांना लाच रक्कम देण्याची ईच्छा नाही. माझे मध्ये व श्री.आंधळे तुलसीदास, डेप्युटी इंजिनियर यांचेमध्ये कुठलेही आर्थिक व्यवहार नाही, कुठलेही वैमनस्य नाही.

तरी, श्री.आंधळे तुलसीदास, डेप्युटी इंजिनियर हे मागत असलेल्या लाचेच्या अनुषंगाने त्यांचेवर आपले विभागामार्फत कायदेशिर कारवाई करावी ही विनंती.

मला मराठीमध्ये लिहीता येत नसल्याने माझी तक्रार मी सांगितल्याप्रमाणे लॅपटॉपवर मराठीमध्येटाईप केलेली असुन ती पिंरट काढुन मी वाचुन पाहिली असता ती माझे सांगणेप्रमाणेच टाईप करण्यात आलेली आहे."

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषगाने पडताळणी करण्यासाठी दिनांक-23/02/2023 रोजी सायंकाळी08:00 वाजताचे सुमारास पोलिस निरीक्षक व-हाडे यांनी माझेकडे व्हाईस रेकॉर्डर देवुन व शासकीय पंच श्री.अभिजीत वसगडे यांच्या सोबत मला लोकसेवक श्री.तुलसीदास आंधळेयांना भेटण्यासाठी पाठविले. मी कृष्णा वेज हॉटेल, किवळे-रावेत याठिकाणी जावुन श्री.तुलसीदास आंधळे यांची भेट घेतली. त्यांचेशी माझे प्लॉट डेवलपमेंटच्या चालु असलेल्या कामाचे संबंधाने व सदरच्या प्रोजेक्टवर कारवाई न करण्यासाठीच्या संबंधाने चर्चा केली. त्यावेळी त्यांनी माझे प्रोजेक्टच्या संबंधाने माझ्याकडे 7,00,000/- रुपयांची मागणी केली. व त्यापैकी 3,50,000/- रुपये दिनांक-24/02/2023 रोजीच घेवुन येण्यास सांगितले. त्यानंतर मी पुन्हा पोलिस निरीक्षक व-हाडे व त्यांचे पथक थांबलेल्या ठिकाणी परत येवुन हकिगत सांगितली तसेच माझेकडील व्हाईस रेकॉर्डरमधील रेकॉर्डींग त्यांनी ऐकले. त्यानंतर पोलिस निरीक्षक व-हाडे यांनी मला लाच मागणी झालेली रक्कम 3,50,000/- रुपये दुस-या दिवशी दिनांक-24/02/2023 रोजी एसीबी, पुणे कार्यालयामध्येहजर करणेस सांगितली.

ठरल्याप्रमाणे मी दिनांक-24/02/2023 रोजी एसीबी, पुणे कार्यालयामध्ये येवुन पोनि व-हाडे यांचेसमक्ष माझेकडील 500/- रुपये दराच्या एकुण 300 भारतीय चलनी नोटा असे एकुण 1,50,000/- रुपये हजर केले. व एवढीच रक्कम मी जमा करु शकलो असे सांगितले असता पोलिस निरीक्षक व-हाडे यांनी त्यांचेकडील उपलबध खेळण्यातील 500/- रुपयेच्या नोटा त्यामध्ये मिक्स करुन 500/- रुपये दराच्या प्रत्येकी 100 नोटा असे एकुण 7 बंडल तयार केले.त्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन व मी आणलेल्या लिफाफ्यामध्ये ठेवुन त्या लिफाफ्याला देखील अँथ्रासिन पावडर लावण्यात आली. त्यानंतर सदरची रक्कम असलेला लिफाफा माझेकडे परत दिला.

त्यानंतर मला लोकसेवक श्री.तुलसीदास आंधळे यांची भेट घेणेकामी जायचे असल्याने मी त्यांना त्यांचा मोबाईल नंबर-9420038415 वर फोन केला असता त्यांनी मला एच.पी.पेट्रोलपंप, म्हसोबा गेटसमोर, शिवाजीनगर, पुणे येथे येण्यास सांगितल्याने पोनि व-हाडे यांनी मला एसीबी, पुणे कार्यालयामधुन साधारण 05.15 वाजताचे सुमारास माझेसोबत व्हाईस रेकॉर्डर व शासकीय पंच श्री.अभिजीत वसगडे यांना देवुन रवाना करण्यात आले. व माझे पाठोपाठ पोलिस निरीक्षक व-हाडे व त्यांचे पथक आले.साधारण 05.45 वाजताचे सुमारास मी ठरलेल्या ठिकाणी जावुन लोकसेवक श्री.तुलसीदास आंधळे यांचे भेट घेतली. त्यावेळी पोनि व-हाडे व त्यांचे पथक आमचे आजुबाजुला येवुन थांबुन राहिले.

त्यावेळी लोकसेवक श्री. तुलसीदास आंधळे यांना माझेसोबत असलेले पंच श्री.अभिजीत वसगडे यांना तेथेच थांबवुन मला लाच रक्कम घेवुन त्यांचेमागे येण्यास सांगितले असता मी त्यांचेसोबत मोदीबाग-1 बिल्डींगच्या आवारामध्ये, गणेशखिंड रोड, पुणे या ठिकाणी गेलो. तेथे माझे प्रोजेक्टच्या कामासंबंधाने त्यांचेशी चर्चा केली त्यानंतर श्री.आंधळे यांनी हात पुढे करुन द्या असे म्हटले असता मी माझेजवळील 3,50,000/- रुपये ठेवलेला लिफाफा त्यांचे हातामध्ये दिला. व पैसे मोजुन घेण्यास सांगितले तेव्हा तो लिफाफा त्यांनी त्यांचेजवळील एका कापडी पिशवीमध्ये ठेवला व लगबगीने मोदीबाग नावाच्या इमारतीमध्ये गेले. त्यावेळी मी लागलीच नियोजित इशारा केला. ती वेळ साधारण 06:00 वाजताची होती. त्यावेळी पोलिस निरीक्षक व-हाडे यांचे पथकाने सदरच्या इमारतीच्या भोवती सापळा लावला व लोकसेवक आंधळे यांची वाट पाहत थांबले. काही वेळाने लोकसेवक श्री.

आंधळे बिल्डींगच्या खाली असलेल्या पार्किंगमधुन एका कारमधुन बाहेर पडले असता सापळा पथकाने त्यांचा पाठलाग केला व सदरची कार ही लोकसेवक आंधळे यांचे कारजवळ येवुन थांबली असता लोकसेवक आंधळे हे त्या कारमधुन खाली उतरताच सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतले त्यावेळी लोकसेवक आंधळे यांना त्यांचे पुर्ण नाव व पद विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री.तुळशीदास आश्रु आंधळे, वय-57 वर्षे, उपविभागीय अधिकारी, भामा आसखेड सिंचन व्यवस्थापन, उप-विभाग-करंजविहीरे, ता-खेड, जिल्हा-पुणे, राहणार-अँक्वामिश्ट, फ्लॅट नं-302, शिंदे वस्तीजवळ, रावेत, पुणे, मोनं-9420038415 असे सांगितले. त्यानंतर पोलिस निरीक्षक व-हाडे यांनी व त्यांचे पथकाने श्री.तुळसीदास आंधळे यांना ताब्यात घेवुन अँटी करप्शन ब्युरो, पुणे कार्यालय, सेंट्रल बिल्डींग यातिकाणी येवुन पुढील कार्यवाही पुर्ण केली.

तरी, माझ्या खेड तालुक्यातील कोळीए येथील जमीनीचे सपाटीकरण व डेव्हलपमेंटचे काम सुरु असताना जलसंपदा विभागातील भामा आसखेड सिंचन व्यवस्थापन, उपविभाग-करंजविहीरे चे उपविभागीय अधिकारी श्री.तुळशीदास आश्रु आंधळे यांनी कामाचे ठिकाणी भेट देवुन पाहणी केली व 'पुर रेषेच्या आतमध्ये तुम्ही डेव्हलपमेंटचे काम केले आहे त्यामुळे तुमच्यावर रितसर कारवाई करणार असलेबाबत कळविले' व कारवाई न करणेसाठी त्यांनी माझेकडे 7,00,000/- रुपयांची लाचमागणी करुन सदरच्या लाच रकमेपैकी पहिला हप्ता 3,50,000/- रुपये लाच रक्कम दिनांक-24/02/2023 रोजीचे सायंकाळी 06.00 वाजेच्या सुमारास मोदीबाग-1 बिल्डींगच्या आवारामध्ये, गणेशखिंड रोड, पुणे याठिकाणी स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरुद्ध फिर्याद आहे. माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणेप्रमाणे मराठीमध्ये टाईप करण्यात आली असुन ती बरोबर आहे.

अन्वेषण अधिकारी-श्री संदिप व-हाडे,पोलीस निरीक्षक,लाप्रवि, पुणे मो - 8999825280

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
bajirao devidas naik
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): DGPBDNM8001
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Arvind Khanderao M

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)